महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, मुंबई-४०० ००१
दूरध्वनी क्र. ०२२-२२८३९९२४ ई-मेल: usecpr३.rdd-mh@nic.in
https://rdd.maharashtra.gov.in

---

क्रमांक : १५८५८५२/विमग्रा-२०२६/प्र.क्र.५९/पंरा-३ दिनांक : ०६ मार्च, २०२६

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, ( सर्व )

**विषय :** जागतिक महिला दिनानिमित्त दि. ०८ मार्च २०२६ रोजी राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये विशेष महिला ग्रामसभा आयोजित करण्याबाबत.

**संदर्भ :-** १. अध्यक्षा , महाराष्ट्र राज्य महिला आयोग, बांद्रा, मुंबई यांचे दि.१८.०२.२०२६ रोजीचे पत्र.
२. महिला व बाल विकास विभाग यांचे दि. ०४.०३.२०२६ रोजीचे पत्र

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये जागतिक महिला दिनानिमित्त ८ मार्च २०२६ रोजी **"विशेष महिला ग्रामसभा"** आयोजित करुन त्यानंतर वेळोवेळी होणाऱ्या ग्राम सभांमध्ये महिला सक्षमीकरणाच्या अनुषंगाने ठराव संमत करण्यासाठी राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना निर्देश देण्याबाबत विनंती केली आहे.

२. संदर्भ क्र. १ मध्ये नमुद मुद्दयांच्या अनुषंगाने, राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्राम सभा आयोजित करण्याकरीता आवश्यक ती कार्यवाही करावी, हि विनंती.

३. सदर सुचना महिला व बाल विकास विभागाच्या सहमतीने देण्यात येत आहे.

सोबत : संदर्भाधीन पत्रे

आपला,

(मनोज नुक्ते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

e- 9866759


दूरध्वनी क्र-०२२ . २२०२७०५०
Email ID:desk2.wcdd-mh@mah.gov.in

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
नवीन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.


---

क्रमांक: मबावि २०२६ /प्र.क्र. ४६ /का-०२ दिनांक:- ०४ मार्च, २०२६.

प्रति,

प्रधान सचिव,
ग्राम विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई.

विषय :- जागतिक महिला दिनानिमित्त दि.०८ मार्च,२०२६ रोजी राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये विशेष महिला ग्रामसभा आयोजित करण्याबाबत.

संदर्भ:- अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांचे पत्र क्र. ममआ-२०२६/विमग्रास/का-७/३००, दि. १८.०२.२०२६

महोदय,

अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या दि.१८.०२.२०२६ च्या पत्राची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे.

२. संदर्भिय पत्रान्वये जागतिक महिला दिनानिमित्त दि. ०८ मार्च, २०२६ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त दि.०८ मार्च २०२६ रोजी "विशेष महिला ग्रामसभा" घेऊन व त्यानंतर वेळोवेळी होणाऱ्या ग्राम सभांमध्ये महिला सक्षमीकरणाच्या अनुषंगाने ठराव समंत करण्यासाठी राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना निर्देश देण्याबाबत विनंती केली आहे.

३. उपरोक्त पत्रामध्ये नमूद केलेल्या महिलांविषयक बाबी या विभागाशी संबंधित आहेत. परंतु, ग्राम सभा आयोजित करणे व ग्राम पंचायतींना निर्देश देणे हा विषय ग्राम विकास विभागाशी संबंधित असल्याने याबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावरुन होणे आवश्यक आहे. तरी याबाबत आवश्यक कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला,

सं. म. दळवी

(संतोष म. दळवी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र:- वरीलप्रमाणे

प्रत:- निवडनस्ती का -२,

D:\Sonawane\Mahila Din\2026.docx

१/ग्रा(का१)
6.3.2026

॥ स्त्रीशक्तिरतुल्या सदा ॥

रुपाली चाकणकर (राज्यमंत्री दर्जा)
Rupali Chakankar (State Minister Rank)

सत्यमेव जयते

अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
महाराष्ट्र राज्य

CHAIRPERSON
MAHARASHTRA STATE COMMISSION FOR WOMEN
GOVERNMENT OF MAHARASHTRA

क्रमांक :- ममआ-२०२६/विमग्रास/का-७/३०० 
दिनांक : १८.०२.२०२६

प्रति,

१. मा.ना.श्री. जयकुमार गोरे,
मंत्री,
ग्राम विकास व पंचायतराज विभाग,
मंत्रालय, मुंबई.

२. मा. ना.श्रीमती आदिती ताई तटकरे,
मंत्री,
महिला व बालविकास विभाग,
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई - 400032.

विषय :- जागतिकमहिला दिनानिमित्त दिनांक ०८मार्च २०२६ रोजी राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये **विशेष महिला ग्रामसभा**" आयोजित करण्याबाबत.

आदरणीय महोदय/महोदया,

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम १९९३ अन्वये करण्यात आली असून स्त्रियांशी संबंधित असणाऱ्या कायद्यांचे परिणामकारकरित्या संनियंत्रण व अंमलबजावणी करण्यासाठी व स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे व उंचावणे या गोष्टींशी संबंधित असलेल्या सर्व बाबींवर शासनाला सल्ला देणे हे आयोगाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

दि. ८ मार्च २०२६ रोजी जागतिक स्तरावर जागतिक महिला दिन म्हणून सर्व देशांमध्ये साजरा केला जातो. यावर्षीसंयुक्त राष्ट्र संघाने सन २०२६ हे वर्ष **"आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष"** म्हणूनघोषित केले आहे.

पुरोगामी व प्रगत राज्य असलेल्या महाराष्ट्रात बाल विवाह होत असल्याची आकडेवारी समोर आली आहे. महिला सर्वच क्षेत्रात आघाडीवर असतानाही, स्त्री-भ्रूण हत्या,हुंडाबळी, विधवा महिलांना रुढी व अंधश्रध्देमुळे जाचक प्रथांना सामोरे जावे लागत आहे. या सर्व बाबींचा गांभिर्याने विचार करता तातडीने उपाय योजना करणे, तसेच महिलांच्या सक्षमीकरणासाठी व्यापक स्तरावर जनजागृती करणेही आवश्यक आहे.

यास्तव राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये ८ मार्च जागतिक महिला दिनाच्या रोजी**"विशेष महिला ग्रामसभा"** आयोजित करुन सदर ग्रामसभेस महिलांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याबाबत आवाहन करण्यात यावे. सदर ग्रामसभेत खालील प्रमाणे ठराव संमत होण्यासाठी निर्देश देणे आवश्यक आहे.

- **बालविवाह रोखणे** :गावात बाल विवाह होऊ नयेत यासाठी बालविवाहाचे दुष्परिणाम सांगून त्यामुळे समाजात होणा-याघातक परिणामांबद्दल जनजागृती निर्माण करुन ठराव संमत करणे,
- **विधवाप्रथा बंदी** : पतीच्या निधनानंतर रुढी व अंधश्रध्देमुळे विधवा महिलांना जाचक असणा-या प्रथा बंद करणे, जसे की, पत्नीच्या कपाळावरील कुंकू पुसणे, गळ्यातील मंगळसूत्र तोडणे, हातातील बांगड्या फोडणे, पायातील जोडवी काढणे, धार्मिक कार्यक्रमांमध्ये तिला प्रवेश नाकारणे यांसारखी बंधने विधवा प्रथेने लादली असल्याने हे टाळून विधवा महिलांना एक व्यक्ती म्हणून त्यांचे सन्मानकारक अधिकार मिळावेत याकरिता ठराव संमत करणे.
- **हुंडाबंदी** : प्रत्येकाने हुंडा मागणी करणे आणि हुंडा देणे या दोन्ही गोष्टींना विरोध केला पाहिजे. संपूर्ण गावाने एकत्र येऊन हुंडा विरोधी मोहीम आखली पाहिजे. शिक्षण आणि जनजागृतीच्या माध्यमातून जनसामान्यापर्यंत हुंडाबळीच्या दुष्परिणामांबद्दल जागरुक केले पाहिजे, गावात हुंडाप्रथा व हुंडाबळी होऊ नयेत, याकरिता जनजागृती करणे.
- **महिला सक्षमीकरण**: महिलांच्या सक्षमीकरणासाठी वेगवेगळ्या उपाययोजना करणे, जसे की मुलींच्या शिक्षणाला प्राथमिकता देणे, स्त्रीभ्रूणहत्या बंदी विषयक जनजागृती करणे, स्त्रियांना समान न्यायाबद्दल जनजागृती करणे व इतर. मुलींचा जन्मदर वाढावा यासाठी प्रयत्न करणे, महिला सक्षमीकरणाच्या अनुषंगाने गावपातळीवर महिलांना सन्मानाने वागविणे हे आपले समाज म्हणून कर्तव्य आहे, ही भावना जनसामान्यांच्या मनात रुजवणेही गरजेचे आहे, जेणेकरुन भविष्यात महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलून त्यांना सन्मानाची वागणूक मिळू शकेल, अशी आयोगाची भूमिका आहे.

कृ.मा.प. २

म.व.बा.वि. सचिव अ.क्र. १०४ दि. २५/०२/२६

मंत्रालय ... भवन (म्हाडा बिल्डिंग), ... कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१. दूरध्वनी क्र. ०२२ २६५९ ०७३९
msewmahilaayog@gmail.com www.mscw.org.in

याबाबतचे ठराव नियमितपणे ग्रामसभेत संमत करण्यात यावेत. तसेच महिला ग्रामसभा न घेणा-या ग्रामपंचायतींना समज देण्यात यावी.

सबब, या वर्षी जागतिक महिला दिनानिमित्त दिनांक ०८मार्च २०२६रोजी **"विशेष महिलाग्रामसभा"** घेवून व त्यानंतर वेळोवेळी होणा-या ग्रामसभांमध्ये महिला सक्षमीकरण च्या अनुषगाने ठराव संमत करण्यासाठी आपल्या स्तरावरुन ग्रामविकास विभागामार्फत राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना निर्देश देण्यात यावे, अशी आपणांस या पत्राद्वारे विनंती करण्यात येत आहे.

सस्नेह,

आपली स्नेहांकित,

रुपाली चाकणकर
(अध्यक्षा)

**प्रत : (उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित)**

१. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग, मंत्रालय, मुंबई
२. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //
रुपाली चाकणकर (राज्यमंत्री दर्जा)
Rupali Chakankar (State Minister Rank)

सत्यमेव जयते

अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
महाराष्ट्र राज्य
CHAIRPERSON
MAHARASHTRA STATE COMMISSION FOR WOMEN
GOVERNMENT OF MAHARASHTRA

क्रमांक :- ममआ-२०२६/विमग्रास/का-७/300
दिनांक : १८.०२.२०२६

प्रति,
१. मा.ना.श्री. जयकुमार गोरे,
मंत्री,
ग्राम विकास व पंचायतराज विभाग,
मंत्रालय, मुंबई.
२. मा. ना. श्रीमती आदितीताई तटकरे,
मंत्री,
महिला व बालविकास विभाग,
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई - 400032.

विषय :- जागतिक महिला दिनानिमित्त दिनांक ०८ मार्च २०२६ रोजी राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये "**विशेष महिला ग्रामसभा**" आयोजित करण्याबाबत.

आदरणीय महोदय/महोदया,

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम १९९३ अन्वये करण्यात आली असून स्त्रियांशी संबंधित असणाऱ्या कायद्यांचे परिणामकारकरित्या संनियंत्रण व अंमलबजावणी करण्यासाठी व स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे व उंचावणे या गोष्टींशी संबंधित असलेल्या सर्व बाबींवर शासनाला सल्ला देणे हे आयोगाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

दि. ८ मार्च २०२६ रोजी जागतिक स्तरावर जागतिक महिला दिन म्हणून सर्व देशांमध्ये साजरा केला जातो. या वर्षी संयुक्त राष्ट्र संघाने सन २०२६ हे वर्ष **"आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष"** म्हणून घोषित केले आहे.

पुरोगामी व प्रगत राज्य असलेल्या महाराष्ट्रात बाल विवाह होत असल्याची आकडेवारी समोर आली आहे. महिला सर्वच क्षेत्रात आघाडीवर असतानाही, स्त्री-भ्रूण हत्या, हुंडाबळी, विधवा महिलांना रुढी व अंधश्रध्देमुळे जाचक प्रथांना सामोरे जावे लागत आहे. या सर्व बाबींचा गांभिर्याने विचार करता तातडीने उपाय योजना करणे, तसेच महिलांच्या सक्षमीकरणासाठी व्यापक स्तरावर जनजागृती करणेही आवश्यक आहे.

यास्तव राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये ८ मार्च जागतिक महिला दिनाच्या रोजी **"विशेष महिला ग्रामसभा"** आयोजित करुन सदर ग्रामसभेस महिलांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याबाबत आवाहन करण्यात यावे. सदर ग्रामसभेत खालील प्रमाणे ठराव संमत होण्यासाठी निर्देश देणे आवश्यक आहे.

- **बालविवाह रोखणे :** गावात बाल विवाह होऊ नयेत यासाठी बालविवाहाचे दुष्परिणाम सांगून त्यामुळे समाजात होणा-या घातक परिणामांबद्दल जनजागृती निर्माण करुन ठराव संमत करणे,
- **विधवाप्रथा बंदी :** पतीच्या निधनानंतर रुढी व अंधश्रध्देमुळे विधवा महिलांना जाचक असणा-या प्रथा बंद करणे, जसे की, पत्नीच्या कपाळावरील कुंकू पुसणे, गळ्यातील मंगळसूत्र तोडणे, हातातील बांगड्या फोडणे, पायातील जोडवी काढणे, धार्मिक कार्यक्रमांमध्ये तिला प्रवेश नाकारणे यांसारखी बंधने विधवा प्रथेने लादली असल्याने हे टाळून विधवा महिलांना एक व्यक्ती म्हणून त्यांचे सन्मानकारक अधिकार मिळावेत याकरिता ठराव संमत करणे.
- **हुंडाबंदी :** प्रत्येकाने हुंडा मागणी करणे आणि हुंडा देणे या दोन्ही गोष्टींना विरोध केला पाहिजे. संपूर्ण गावाने एकत्र येऊन हुंडा विरोधी मोहीम आखली पाहिजे. शिक्षण आणि जनजागृतीच्या माध्यमातून जनसामान्यापर्यंत हुंडाबळीच्या दुष्परिणामांबद्दल जागरुक केले पाहिजे, गावात हुंडाप्रथा व हुंडाबळी होऊ नयेत, याकरिता जनजागृती करणे.
- **महिला सक्षमीकरण :** महिलांच्या सक्षमीकरणासाठी वेगवेगळ्या उपाययोजना करणे, जसे की मुलींच्या शिक्षणाला प्राथमिकता देणे, स्त्रीभ्रूणहत्या बंदी विषयक जनजागृती करणे, स्त्रियांना समान न्यायाबद्दल जनजागृती करणे व इतर. मुलींचा जन्मदर वाढावा यासाठी प्रयत्न करणे, महिला सक्षमीकरणाच्या अनुषंगाने गावपातळीवर महिलांना सन्मानाने वागविणे हे आपले समाज म्हणून कर्तव्य आहे, ही भावना जनसामान्यांच्या मनात रुजवणेही गरजेचे आहे, जेणेकरुन भविष्यात महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलून त्यांना सन्मानाची वागणूक मिळू शकेल, अशी आयोगाची भूमिका आहे.

कृ.मा.प. २

कार्यालय : गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग), पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१. दूरध्वनी क्र. ०२२ २६५९ ०७३९
mscwmahilaayog@gmail.com www.mscw.org.in

याबाबतचे ठराव नियमितपणे ग्रामसभेत संमत करण्यात यावेत. तसेच महिला ग्रामसभा न घेणा-या ग्रामपंचायतींना समज देण्यात यावी.

सबब, या वर्षी जागतिक महिला दिनानिमित्त दिनांक ०८ मार्च २०२६ रोजी **"विशेष महिला ग्रामसभा"** घेवून व त्यानंतर वेळोवेळी होणा-या ग्रामसभांमध्ये महिला सक्षमीकरणाच्या अनुषगाने ठराव संमत करण्यासाठी आपल्या स्तरावरुन ग्रामविकास विभागामार्फत राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना निर्देश देण्यात यावे, अशी आपणांस या पत्राद्वारे विनंती करण्यात येत आहे.

सस्नेह,

आपली स्नेहांकित,

रुपाली चाकणकर
(अध्यक्षा)

**प्रत : (उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित)**

१. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग, मंत्रालय, मुंबई
२. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई